। ब्राह्मण कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिच्या उन्नतीसाठी एक प्रभावी माध्यम ।

ॐ प्रकाशन

# ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका

BRAHMAN BUSINESS JOURNAL

■ पुणे ■ ऑगस्ट २०१८ ■ वर्ष १४ - अंक ८ ■ किंमत रु. ५०/- ■ पृष्ठसंख्या ६४ ■ मुख्य संपादक : गोविंद हर्डीकर

Interact




# मनोरंजनातून गणिताकडे

## वैदिक गणित - सर्वांसाठी

**मागील अंकात वैदिक गणिताची पार्श्वभूमी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून बघितली. तुम्हाला नक्कीच याचा फायदा झाला असेल, अशी माझी खात्री आहे. चला तर मग, पुढच्या प्रवासाला....**



**विजय कुलकर्णी**
९६०४५५५१९३

मी म्हटलं होतं की नोकरदार तसेच व्यावसायिक लोकांनादेखील याचा निश्चित फायदा होतो. ते कसं आपण बघू.

**प्रश्न : सीए - मी सीए आहे. मला याचा उपयोग होईल काय?**

अगदी! मी म्हणेन की, २००% याचा उपयोग आपण आपल्या व्यवसायात करू शकता. बॅलन्सशीट, ऑडिटिंग, अकौंटिग इत्यादी अनेक गोष्टींसाठी गणित लागतेच. बऱ्याच वेळा आपल्याला गणिते तोंडी करण्याची वेळ येते तेव्हा वैदिक गणित हमखास उपयोगी पडते. वेग व अचूकता वाढते.

**प्रश्न : बँक मॅनेजर - मी हे गणित शिकू शकतो काय?**

नक्कीच. बँकेमध्ये गणितच जास्त महत्त्वाचे ठरते. टक्केवारी काढणे, व्याजदर काढणे, मुद्दल, लोन इत्यादी अनेक गोष्टी नेहमीच तुम्ही करता. त्याही वेळी गणितीय आकलन शक्तीचा वापर करण्यासाठी वैदिक गणित प्रभावी ठरते. आकलन शक्ती वाढते.

**प्रश्न : खेळाडू - मी बुद्धिबळ खेळतो. तर मला इथे वैदिक गणित कसे वापरता येईल?**

आता बघा, बुद्धिबळ म्हणजे बुद्धीला चालना देणाराच खेळ आहे ना! एकूण ६४ घरांचा खेळ खेळताना आपल्याला उजव्या मेंदूतील कलात्मकतेचा व कल्पकतेचा वापर करावा लागतो. इथे वैदिक गणिताचा अप्रत्यक्षपणे उपयोग होतो. कारण वैदिक गणित येणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या उजव्या मेंदूचा म्हणजे कलात्मक ऊर्जेचा जास्त वापर करता येतो. पर्यायाने तर्कबुद्धी व निरीक्षण शक्तीत वाढ होते.

**प्रश्न : विद्यार्थी - सर, मला शाळेत याचा काय उपयोग होईल?**

मित्रा, वैदिक गणित म्हणजे वेगळं असं काही नाही बरं. तेही एक गणितच आहे. फक्त स्वरूप व त्यातील क्रिया पारंपरिक नाहीत. गणिताचा पेपर सोडवताना तुझे कच्चे काम (रफ वर्क) वाचणार आहे. म्हणजे वेळेची बचत होऊन वेग व अचूकता ही वाढणार आहे. बरं, पाढे पाठांतराचीही आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे हे गणित तुला शाळेतही गरजेनुसार वापरता येईल.

**प्रश्न : नागरिक - हे वैदिक गणित मीही शिकू शकतो का?**

हो निश्चितच, सर्वांनाच दैनंदिन व्यवहार करण्यासाठी वैदिक गणिताचा उपयोग आहे. किराणा माल, इतर काही किरकोळ खर्च हेसुद्धा वैदिक गणित पद्धतीनुसार आपण पटपट करून इतरांना चकित करू शकता.

तेव्हा वैदिक गणित - सर्वांसाठी

हा अंक घेऊन येणाऱ्यास फीमध्ये १०% सवलत दिली जाईल. ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध.

Weekend batches are available.

Vijaykulkarni15@yahoo.in

***



**Om Prakashan**
2nd Floor, Plot No. 8 Raghukul Society, Opp. Girijashankar Vihar, karve Nagar, Pune 411052,
Contact No. 81490 90765 / 72767 00766, Email : patrika.bvp@gmail.com